ठाणे, बुधवार दि. ११ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १३५ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## खडसे सांगा कुणाचे ?

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांपासून राज्यात एकनाथ खडसे यांची घरवापसी अर्थात पुन्हा भाजपात प्रवेश होण्याची चर्चा सुरू झाली होती. याला स्वतः एकनाथ खडसे यांनीही दुजोरा दिला होता. .......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



विधानसभा निवडणूक जवळ आली आहे. आता आपल्याला अशा पक्षात गेले पाहिजे, जो आपल्याला ज्यादा फंड देईल. समजलं ?

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट अभियानाला सुरुवात

# मुख्यमंत्री शिंदे थेट लाडक्या बहिणीच्या घरी

**ठाणे : महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेची सध्या जोरदार चर्चा आहे. सरकारची ही योजना कमालीची लोकप्रिय झाल्याचा दावा सरकारच्या वतीनं केला जातोय. त्याच्या एक पाऊल पुढे जाऊन मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी कुटुंबांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भेट देत आहेत. पहिल्याच दिवशी मुख्यमंत्र्यांनी ठाण्याच्या किसननगरमधील लाभार्थी कुटुंबांची भेट घेतली. मुख्यमंत्री शिंदेंनी या महिलांसोबत चर्चा केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा महिलांना कसा फायदा होतोय, याची विचारपूसही मुख्यमंत्र्यांनी केल्याची माहिती आहे. स्वत: राज्याचे मुख्यमंत्री आपल्या घरी येऊन विचारपूस करत असल्यानं सर्वसामान्य महिलाही भारावून जात आहेत.**

### ठाण्यात कुटूंबभेटीचं सत्र... शिवसैनिक राज्यातल्या घरा घरात पोहचणार







(छाया-मनोज सिंह)

**लाडकी बहिणीचा कुटुंब भेट**

कुटुंब भेट हा कार्यक्रम राज्यभर राबवला जाणार आहे. शिवसेना शिंदे पक्षाचे १ लाख कार्यकर्ते प्रत्येकी १५ कुटुंबांना रोज भेट देणार आहेत. एका आठवड्यात १ कोटी कुटुंबांना भेटण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलंय. मुख्यमंत्र्यांनी स्वत: ठाण्यातील १५ कुटुंबांना भेट दिलीय. यावेळे मुख्यमंत्र्यांनी आमची ताकद वाढवा अजून पैसे वाढवू, १५०० वरच थांबणार नाही अशी प्रतिक्रिया दिली.

महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या घोषणेनंतर राज्यभरातील महिलांनी मोठ्या संख्येनं यासाठी नोंदणी केली. लाखोंच्या संख्येनं महिला जोडल्या गेल्याचा सरकारचा दावा आहे. राज्यभरातील महिलांकडून या योजनेचं स्वागत करण्यात आलं. बँकांसमोर गर्दी करून महिलांनी अर्ज भरले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांमधून उत्तम प्रतिसाद मिळतोय. त्यामुळं येत्या काळात ही योजना गेमचेंजर ठरणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.

### यासाठी नवीन ॲप, ॲपमध्ये माहिती गोळा करणार....

गोळा केलेली सर्व माहिती एका ॲपमध्ये स्टोर केली जाणार असल्यामुळे प्रत्येक घराची माहिती या ॲपमध्ये मिळणार आहे. या ॲपच्या मार्फत योजना लोकांपर्यंत पोहोचवल्या जातील त्याचप्रमाणे किती जणांनी योजनेचा लाभ घेतला याचीही नोंदणी केली जाणार आहे. जवळपास एका महिन्याचा कालावधी देण्यात आलेला आहे जेणेकरून दीड कोटीहून जास्त महिला या योजनेचा लाभ घेऊ शकतील. या योजनेतील लाभार्थ्यांवर लक्षही ठेवलं जाणार आहे त्याचप्रमाणे कोणते शिवसैनिक हे काम करत आहे यावरही लक्ष ठेवले जाणार आहे.

### काय आहे योजना ?

या मोहिमेत शिवसेनेचे प्रत्येक मतदार संघातील कार्यकर्ते दिवसाला १५ घरी भेट देणार आहेत, या भेटीत कुटुंबाच्या समस्या जाणून घेतली जाणार आहे. योजनेची अंमलबजावणी, नवी नोंदणी, इतर ज्येष्ठ नागरिक, आणि युवकांच्या पर्यंत योजना पोहचल्या याची माहिती घेतली जाणार आहे. लाडकी बहिण, कुटुंब भेट योजनेंतर्गत शिवसैनिक दररोज १० कुटुंबाना भेट देणार आहेत. १० दिवसात १०० कुटुंबाना शिवसैनिक भेटणार आहेत.

## शिवपुतळा कोसळल्याप्रकरणी आपटेच्या पोलीस कोठडीत वाढ

### बांधकाम सल्लागार डॉ. पाटील याला न्यायालयीन कोठडी

**सावंतवाडी : मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे व बांधकाम रचना सल्लागार डॉ. चेतन पाटील यांची पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने आज दुपारी पुन्हा मालवण न्यायालयात हजर करण्यात आले. यामध्ये जयदीप आपटे याला दि. १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी तर पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पाटील याची सावंतवाडी कारागृहात रवानगी करण्यात येणार आहे.**

राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी घडली होती. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुतळ्याचा ठेकेदार जयदीप आपटे, तांत्रिक सल्लागार चेतन पाटील या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर प्रथम डॉ. पाटील याला अटक करून पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर आपटे याला अटक केल्यावर या दोघांनाही १० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आज



कोठडीची मुदत संपल्याने या दोघांनाही कडेकोट पोलीस बंदोबस्तात पुन्हा मालवण न्यायालयात हजर करण्यात आले.

मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याची अजून चौकशी करायची असल्याने सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी अशी मागणी (पान २ वर)

## आमच्यामध्ये कोणताही श्रेयवाद नाही-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : राज्य सरकारच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी ठाण्याच्या किसननगर भागातून लाडकी बहीण कुटुंब भेट अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी वागळे इस्टेट भागातील १५ कुटुंबाची भेट घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री घरी आल्याने अनेकजण भारावून गेले होते. दरम्यान, शासकीय योजनांवरून महायुतीच्या नेत्यांमध्ये श्रेयवाद रंगल्याची चर्चेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी आमच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा श्रेयवाद नसल्याचे स्पष्ट केले.



राज्य सरकारच्या १० योजनांची माहिती घरोघरी देण्यासाठी तसेच या योजनांचा लाभ मिळतो की, नाही याचा आढावा घेण्याच्या उद्देशाने शिवसेनेकडून राज्यभरात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण कुटुंब भेट' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोपरी- पाचपाखाडी मतदारसंघातील किसननगर आणि (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

### कोकणवासियांसाठी परतीच्या प्रवासासाठी रेल्वे विभागाच्या वतीनं विशेष रेल्वेगाड्या

मुंबई- गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेल्या चाकरमान्यांचा परतीचा प्रवास दीड आणि पाच दिवसांच्या गणपती विसर्जनानंतर होणार आहे. किंबहुना काहींचा परतीचा प्रवास सुरूही झाला आहे. अशा सर्वच मंडळींसाठी कोकण रेल्वे पुन्हा एकदा सज्ज झाली असून, प्रवाशांचा परतीचा प्रवास सुकर होण्यासाठी रेल्वे विभागाच्या वतीनं मडगाव-पनवेल विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात येणार आहेत. मध्य आणि कोकण रेल्वेच्या वतीनं पनवेल ते मडगावदरम्यान अतिरिक्त दोन गणशोत्सव विशेष रेल्वेगाड्या चालवल्या जाणार आहेत. कोकण रेल्वे मार्गावर प्रवाशांची रेल्वे गाड्यांची मागणी आणि त्यांची होणारी गर्दी लक्षात घेता रेल्वेनं जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार गाडी क्रमांक ०१४२८ ही विशेष रेल्वेगाडी १५ सप्टेंबर रोजी मडगाव येथून सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी सुटेल आणि पनवेलला ती त्याच दिवशी रात्री १० वाजून १५ मिनिटांनी पोहोचणार आहे. ०१४२७ ही गाडी १५ सप्टेंबरला पनवेलहून रात्री ११ वाजून ४५ मिनिटांनी सुटणार असून, मडगावला ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता पोहोचणार आहे. (पान २ वर)

## सफाई कर्मचाऱ्यांच्या २८ व्या दिवशी साखळी उपोषणाला पूर्णविराम




ठाणे - ठाण्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागणीसाठी श्रमिक जनता संघाच्या वतीने ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी साखळी उपोषण सुरु करण्यात आलेले होते. दरम्यान साखळी उपोषणाच्या २८ व्या दिवशी ९ सप्टेंबर रोजी किमान वेतन अधिनियमानुसार कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा झाल्या नंतरच कामगारांच्या सहमतीने श्रमिक जनता संघाचे सरचिटणीस जगदीश खैरालिया व उपाध्यक्ष डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी उपोषणाची सांगता केली. १३ ऑगस्ट पासून सुरू असलेले बेमुदत साखळी उपोषण आंदोलन यशस्वी केल्याने युनियनच्या अध्यक्ष मेधा पाटकर यांनी लढाऊ कामगारांचे अभिनंदन केले.

ठाणे प्रादेशिक मनोरूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. सुरभी रानडे यांनी उपोषणकर्त्यांना फळाचा रस पाजून उपोषण सोडवले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुळीक यांनी सांगितले की, किमान वेतन अधिनियमानुसार वेतन अदा केले आहे आणि किमान वेतनाच्या फरकाच्या रकमेचा प्रस्ताव वरिष्ठांकडे मंजुरी साठी पाठवले आहे. तेही लवकरच मिळेल त्यामुळे आता आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती करत आहे. रूग्णालय प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्याने पाच वर्षाच्या किमान वेतनाच्या फरकाची थकीत रक्कम मिळण्यासाठी मार्ग मोकळा झाला असल्याचे युनियनचे सरचिटणीस जगदीश खैरालिया यांनी (पान २ वर)



गणपती पाठोपाठ येणारा गौरीपूजन हा महत्वाचा सण महिलांनी घराघरांतून मोठ्या भक्तिभावाने मंगलमय वातावरणात गौराईंचे स्वागत करत साजरा केला. ठाण्यातील चेंदणी कोळीवाडा परिसरातील देवेंद्र कृष्णा साळेकर यांच्या घरची गौरीचे आगमन झाले असून यंदा त्यांचे १०८ वे वर्ष आहे. (छाया - मनोज सिंह)





काल मंगळवारी कळव्यातील मूर्तीशाळेत धर्मवीर आनंद दिघे यांनी स्थापन केलेल्या जय अंबे माँ सार्वजनिक धर्मदाय संस्था, टेंभीनाका मित्र मंडळाच्या आई भवानी मातेच्या मुर्तीचा वाट पूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पाटाचे विधिवत पूजन करून करून अंबे मातेचा जयघोष करीत माताला आवाहन केले गेले. यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी परिवहन समिती सभापती विलास जोशी, विधानसभा प्रमुख हेमंत पवार, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, टेंभीनाका शिवसेना शाखेचे शाखाप्रमुख निखिल बुडजडे, उपविभागप्रमुख स्वानंद पवार तसेच मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया - मनोज सिंह)

## नवी मुंबई महापालिकेचे स्वत:चे मेडिकल कॉलेज सुरू करण्यास नॅशनल मेडिकल कमिशनची परवानगी प्राप्त

**नवी मुंबई महानगरपालिकेचे 'पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अर्थात National Medical Commission मार्फत परवानगी प्राप्त झालेली आहे. यामुळे नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेस शक्य होणार असून महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचे सक्षमीकरण होणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले आहे.**

महानगरपालिकेचे पदव्युत्तर वैदयकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. राज्य शासनामार्फत आवश्यक परवानगी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले व त्यांनी संबंधित विभागांस जलद कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांचेही आवश्यक परवानगी प्राप्त व्हावी यादृष्टीने सहकार्य लाभले. तसेच विधानसभा सदस्य आ. गणेश नाईक व विधानसभा सदस्य आ. मंदाताई म्हात्रे यांनीही यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

त्यानुसार राज्य शासनामार्फत आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर ठाणे लोकसभा सदस्य खा. नरेश म्हस्के यांनी यामध्ये विशेष पुढाकार घेत केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री ना. प्रतापराव जाधव व केंद्रीय आरोग्य विभाग यांच्याकडे परवानगी मिळण्याबाबत पत्रव्यवहार करुन व प्रत्यक्ष भेटून सातत्याने पाठपुरावा केला. याचा सकारात्मक परिणाम होत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची नवी मुंबई महानगरपालिका पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय (Post Graduate Institute of Medical Science) सुरु करण्यास परवानगी प्राप्त झाली असून ही नवी मुंबईकरांना गणेशोत्सवात मिळालेली मौल्यवान आरोग्यपूर्ण भेट आहे.


सदर मंजूरीनुसार पीजी मेडीकल सायन्स इन्स्टिटयुटमध्ये पहिल्या टप्प्यात 'मेडिसीन (३ सीट्स)', 'ऑर्थोपॅडीक (२ सीट्स)', 'गायनॅकोलॉजी (८ सीट्स)' व 'पिडीयाट्रीक (४ सीट्स)' अशा ४ शाखा सुरु करण्यात येत असून लवकरच 'सर्जरी' याही शाखेला परवानगी प्राप्त होणार आहे. मेडीकल सायन्स इन्स्टिटयुट सुरु करण्यासाठी महानगरपालिकेच्या (पान २ वर)

- यात्दारे महापालिका रूग्णालयात मेडिकल इन्टेसिव्ह केअर, पिडीयाट्रीक इन्टेसिव्ह केअर, इमर्जन्सी ॲण्ड ट्रॉमा सर्व्हिसेस अशा सुपर स्पेशालिटी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न
- या माध्यमातून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे सक्षमीकरण होणार
- नवी मुंबईकरांना महानगरपालिका रुग्णालयात अधिक उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होणार

### नवी मुंबईकरांना गणेशोत्सवाची आरोग्यपूर्ण भेट



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## खडसे सांगा कुणाचे ?

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांपासून राज्यात एकनाथ खडसे यांची घरवापसी अर्थात पुन्हा भाजपात प्रवेश होण्याची चर्चा सुरू झाली होती. याला स्वतः एकनाथ खडसे यांनीही दुजोरा दिला होता. त्यानुसारच त्यांनी रक्षा खडसे यांचा प्रचारही केला. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर एकनाथ खडसेंचा भाजपा प्रवेश काही होताना दिसत नव्हता. यावरून बरेच दावे–प्रतिदावे झाल्यानंतर अखेर एकनाथ खडसेंनी स्वत:च भाजपाप्रवेश होण्याची शक्यता मावळल्याचे सूतोवाच दिले. या पार्श्वभूमीवर या संपूर्ण घटनाक्रमावर एकनाथ खडसे यांनी आता खुलासा केला आहे. खडसे यांनी अखेरचे कुठे जायचे हे ठरवले पाहिजे, कारण त्यांची भूमिका तळ्यात की मळ्यात अशीच दिसून आली आहे. खडसेंचे मॅन भाजपामध्ये आहे, पण ते तनाने राष्ट्रवादी शरद पवार गटात आहेत, असे दिसते. एकनाथ खडसे यांनी एक वृत्तवाहिनीशी बोलताना, जयंत पाटलांनी माझा राजीनामा अद्याप स्वीकारलेला नसल्याचे नमूद केले आहे. मी भाजपात प्रवेश केलेला नाही. मी आजही शरद पवार गटात आहे. मी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला होता. पण पक्षाध्यक्षांनी तो स्वीकारलेला नाही. मी स्वत:हून भाजपात मला प्रवेश द्यावा अशी विनंती कधीही केली नव्हती. भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मला सूचना केली होती की तुम्ही भाजपामध्ये या. मी त्यांना सांगितले की मी विचार करेन. म्हणून भाजपात जाण्याचा विषय आला, असे एकनाथ खडसे म्हणाले आहेत. खडसे यांनी तळ्यात – मळ्यात करण्यापेक्षा स्पष्ट सांगितले तर बरे होईल असे वाटते. दरम्यान, मध्यंतरी एकनाथ खडसे यांनी भाजपात प्रवेश केल्याचा दावा केला होता. त्यावरही त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. खडसे म्हणाले होते की, भाजपात प्रवेश करावा अशी विनंती मला वरीष्ठांकडून आली. मी म्हणालो थोडा वेळ द्या. त्यांनी मला सांगितले, वेळ कशाला, आत्ताच प्रवेश करा. मी दिल्लीत होतो. विनोद तावडे, रक्षा खडसेंसह मी जे. पी. नड्डांना भेटलो. त्यावेळी त्यांनी माझ्या गळ्यात मफलर घालून सांगितले की तुमचा प्रवेश झाला. पण त्या प्रवेशाला राज्यातील काही नेत्यांकडून विरोध झाला. त्यामुळे माझा भाजपाप्रवेश थांबला, असे एकनाथ खडसे यावेळी म्हणाले. खडसे यांच्या मनातील भाजपात जाण्याची इच्छा तशीच दबलेली आहे. खरे तर भाजपाकडून खडसेंसारख्या ज्येष्ठ नेत्याला मिळालेली वागणूकच हे सांगते की – खडसे भाजपाला नकोसे झाले आहेत. खडसेंच्या हे लक्षात येत नाही की ते जाणूनबुजून या गोष्टीकडे कानाडोळा करीत आहेत ? परंतु एकनाथ खडसेंनी, महायुती की महा विकास आघाडी हे ठरवायलाच हवे, असे वाटते. एकनाथ खडसे यांच्याकडून हेतू साध्य करून त्यांच्याकडे भाजपाने त्यांच्याकडे सोयीस्कररित्या पाठ फिरवली आहे. पूर्वीची भाजपा आणि खडसे बाहेर गेल्यानंतरची भाजपा यांच्यात जमीन – आसमानचा फरक आहे. आता तडजोड घडवून आणणाऱ्या नेत्यांना विशेष महत्व आहे. या भाऊगर्दीत खडसेंना कोण विचारणार? एकनाथ खडसे यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री गिरीश महाजन या राज्यातील भाजपा नेत्यांची नावे घेतली. परंतु एकनाथ खडसे हे ज्येष्ठ नेते असून त्यांना नवीन नेत्यांच्या मागे फिरण्याची आवश्यकता नाही असे वाटते. मध्यंतरी एकनाथ खडसे यांनी भाजपात प्रवेश केल्याचा दावा केला होता. त्यावरही त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. भाजपात प्रवेश देण्याचे आमिष दाखवून खडसेंकडून भाजपाच्या उमेदवाराचा प्रचार करवून घेतले. नंतर हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले, असा आरोप खडसेंनी केला आहे. भाजपातले काही लोक आम्ही यांना साथ देणार नाही, आमचे केडर बंद होईल वगैरे सांगू लागले. ज्या माणसाने ४० वर्षं भाजपा उभी केली, हे आत्ता बोलणारे माझ्या नेतृत्वाखाली काम करत होते. या सगळ्यांना राजकीय जीवनात मी बळ दिले आहे. पण आज तेच काही कारणाने विरोध करत आहेत. हरकत नाही, मीही काही भाजपात जाण्यासाठी फारसा उत्सुक नव्हतो. यासंदर्भात गिरीश महाजन किंवा देवेंद्र फडणवीसांकडून विरोध होऊ शकतो. गिरीश महाजनांनी यावर वारंवार प्रतिक्रिया दिल्या आहेत, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे. खडसेंसारख्या नेत्याने आता भाजपाविरहित वाटचाल करावी, तळ्यात – मळ्यात करणे सोडून द्यावे असे वाटते.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस

- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

## शिवपुतळा कोसळल्याप्रकरणी आपटेच्या पोलीस कोठडीत वाढ

**(पान १ वरून)** सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात करण्यात आली. त्यानुसार न्यायाधीश एम. आर. देवकाते यांनी आपटे याला १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी तर चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावली.
सरकारी अभियोक्ता ड. तुषार भणगे म्हणाले, राजकोट किल्ला येथील पुतळा कोसळल्याप्रकरणातील मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याची पूर्ण चौकशी झालेली नाही. यात आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा पोलिसांकडून तपास व्हायचा आहे. तसेच लॅपटॉप अन्य साहित्य जप्त करायचे आहे. यांसह अन्य बाबींवर युक्तिवाद करण्यात आला. हा युक्तिवाद ग्राह्य मानत न्यायालयाने जयदीप आपटे याला १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणातील दुसरा संशयित आरोपी चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी मिळाली असली तरी पोलीस या प्रकरणाच्या तपासासाठी त्याला पुन्हा ताब्यात घेऊ शकतात असेही ड. भणगे यांनी स्पष्ट केले.

## आमच्यामध्ये कोणताही श्रेयवाद नाही; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**(पान १ वरून)** वागळे इस्टेटमधील १५ कुटुंबाची भेट देऊन केला. मुख्यमंत्र्यांनी महिलांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांची माहिती दिली. या अभियानादरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आमच्यामध्ये कोणत्याही प्रकारची श्रेयवादाची लढाई नाही. आम्ही सरकार म्हणून एकत्रित काम करत आहोत. तसेच महायुतीतील आम्ही तिन्ही पक्ष एकत्रित कार्यक्रम राबवित आहोत. महायुतीमधील प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते लाभार्थी वंचित राहू नये म्हणून चहूबाजूंनी काम करत आहेत असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी शासन आपल्या दारी या योजनेत राज्यातील ५ कोटींहून अधिक नागरिकांना लाभ मिळाला. सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा दीड लाखांवरुन पाच लाख रुपये इतकी वाढविली आहे. हे सरकार शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, वारकरी, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच घटकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला. या अभियानासाठी मोबाईल प तयार करण्यात आला आहे. या पमध्ये जिओ ट्रॅकिंग होणार आहे. या पचा वापर कार्यकर्ते अभियानादरम्यान करणार आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण करण्याची शिकवण दिली. या शिकवणीनुसारच शिवसेनेचा प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्ता काम करत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. तर प्रत्येक शिवसैनिक या योजनेचा आढावा घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या २८ व्या दिवशी साखळी उपोषणाला पूर्णविराम

**(पान १ वरून)** सांगितले आहे. ठाणे प्रादेशिक मनोरूग्णालय येथे एप्रिल २००८ च्या आगोदर १८७ कायमस्वरूपी सफाई कर्मचारी सेवेत होते. शासनाने रूग्णालयातील कायमस्वरूपी सफाई कामगारांना इतरत्र समावून घेऊन कंत्राटदारांमार्फत सुमारे शंभर सफाई कामगारांना तुटपुंजे वेतनावर राबविले जात होते. गेली पाच वर्षे विशेष भत्त्याची दर सहा महिन्यांनी वाढणारी रक्कम कामगारांना पगारात दिली जात नव्हती. श्रमिक जनता संघ युनियनच्यावतीने कोर्टात धाव घेतल्यानंतर मा. ठाणे औद्योगिक न्यायालयाने ११ जून २०२४ रोजी केस नं युएलपी १२६/ २०२१ मध्ये किमान वेतन अधिनियम नुसार वेतन अदा करण्याचे आदेश दिले होते. परंतु मेंटल हॉस्पिटल प्रशासनाने आणि ठेकेदाराने कोर्टाचे आदेश पाळले नाही म्हणून श्रमिक जनता संघ युनियनने २८ दिवस बेमुदत साखळी उपोषणाचा लढा देत शेवटी आता किमान वेतन कायद्यानुसार वेतन लागू करून घेण्यात यश मिळाले आहे.

## नवी मुंबई महापालिकेचे स्वत:चे मेडिकल कॉलेज सुरू करण्यास नॅशनल मेडिकल कमिशनची परवानगी प्राप्त

**(पान १ वरून)** वाशी व नेरुळ सार्वजनिक रुग्णालयात सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे डीन, प्राध्यापक, सहा. प्राध्यापक व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात लवकरच महाविद्यालय सुरू केले जाणार आहे. या पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये (Post Graduate Institute of Medical Science) प्रशिक्षित एमबीबीएस डॉक्टर पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी येतील व नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयातील रुग्णांवरील उपचारांसाठी या प्रशिक्षित डॉक्टर्सचा उपयोग होईल.

## कोकणवासियांसाठी परतीच्या प्रवासासाठी रेल्वे विभागाच्या वतीनं विशेष रेल्वेगाड्या

**(पान १ वरून) कोणकोणत्या स्थानकांवर थांबणार ही विशेष गाडी? –** गणेशोत्सवानिमित्तच्या या रेल्वेगाडीला पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डे, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, झाराप, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी अशा स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत.

**कशी आहे डब्यांची व्यवस्था? –** कोकण रेल्वेच्या या जादा गाडीला तीन तृतीय वातानुकूलित डबे, एक द्वितीय वातानुकूलित डबा, दोन तृतीय इकोनॉमी वातानुकूलित डबे, आठ शयनयान अर्थात स्लीपर, पाच सामान्य द्वितीय अशी व्यवस्था असेल. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार या रेल्वेसाठीचं आरक्षण आणि सर्व माहिती आरक्षण केंद्रांसह आयआरसीटीसी या संकेस्थळावर च्या संकेतस्थळावर १० सप्टेंबरपासून उपलब्ध असेल. त्यामुळं आता परतीच्या प्रवासाची चिंता नको...

---

## नवी मुंबई महानगरपालिका

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्र-नमुंमपा/कार्यकारी अभियंता(बेलापुर)/118/2024-25**

**कामाचे नाव :-** बेलापूर विभागातील नमुंमपा शाळेची स्थापत्य विषयक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 46,86,666/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.11/09/2024 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**( शिरीष आरदवाड )**
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/368/2024

---

Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/13402/18/24
Inquiry/case No. : . **ACC/798/2024**
Name of the Trust : **MAHA AADISHAKTI EDUCATION AND CHARITABLE TRUST**
**Address of the Trust : ROOM NO. D/108, SAI KRISHIKA APARTMENT BUILDING NO. 04, JIVADANI ROAD, VIRAR (EAST) , PALGHAR, VASAI, VASAI**
**Registration Number of the Trust (if)** : MAHA AADISHAKTI EDUCATION AND CHARITABLE TRUST
**Name of the Applicant :** GAURAV SANJIV KALANGAN

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

---

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/12992/18/24
Inquiry/case No. : ACC/III/842/2024
Name of the Trust : **मायली चॅरिटेबल ट्रस्ट**
**Address of the Trust : रो हाऊस नं. २२, राहुल ईस्टेट, मोरिवालि पाडा, अंबरनाथ (ईस्ट), ठाणे, ठाणे, अंबरनाथ, अंबरनाथ**
**Name of the Applicant : श्री. मनोज अभिमन्यु पाटील**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 09/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

---

**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION**
**BHIWANDI (Dist. Thane)**
**MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी – ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/१२२४
दि. १०/०९/२०२४

**बांधकाम विभाग, प्र.स.क्रं १**

**ई–निवीदा सुचना क्रमांक ७५ सन २०२४/२५**

**जनरल निधी अंतर्गत सन २०२४–२५**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक : ११/०९/२०२४ ते दि.:– १८/०९/२०२४ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १. | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका. नविन प्रशासकीय इमारतीतील ५ वा मजला दालन क्रं. ५०५, ६ वा मजला लेखा विभाग, ३ रा मजला मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय, ६ वा मजला मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे कार्यालयात दुरुस्ती, रंगरंगोटी व फर्निचर पुरवणे. | ८,६२,६५३/– | ५९०/– |

वरील ऑनलाईन निविदा दि. १८/०९/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदाही दि. १९/०९/२०२४ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोईप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/–
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

---

## खान्देश विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिवंडी

**खान्देश विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिवंडी**
**३३ व्या अधिमंडळाची वार्षिक बैठकीची सुचना**

सन्माननीय सभासद बंधु व भगिनींनो,
खान्देश विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित भिवंडी या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३३ वा अधिमंडळाची वार्षिक बैठक बुधवार दि. १८/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वा. साईलिला रेसिडेन्सी, कॉलेज रोड, पोस्ट ऑफिस समोर येथे संस्थाध्यक्ष श्री साईनाथ आर. पवार यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे,
२) दि. ३१/३/२०२४ अखेर संपण्याची वार्षिक आर्थिकपत्रके, नफा तोटा व ताळेबंद पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३)संस्थेच्या सन २०२३–२४ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.
४) सन २०२४–२५ या वर्षासाठी वैधानिक हिशोब तपासणींच्या नेमणूक करणे.
५) सन २०२४– २५ या वर्षासाठी अंतर्गत लेखा परीक्षकांची नेमणुक करणे वत्यांचा मेहनताना ठरविणे.
६) सन २०२४–२५ चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
७) क्रियाशील व अक्रियाशील सभासदांसंबंधी निकष पुर्ततेची माहिती सादर करणे.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) ब मधील तरतुदीनुसार व्यवस्थापक समिती सदस्यांना व त्यांचे कुटुंबियांना दिलेली कर्ज व वसुलीची नोंद घेणे.
९) थकित कर्जाबाबत चर्चा करणे व वसुलीसाठी आवाहन करणे.
१०) थकित कर्जाबाबत एक रक्कमी सामोपचार कर्ज परतफेड योजनेचा (**OTS**) आढावा घेणे व त्यास मंजुरी देणे.
११ ) मागील आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : भिवंडी
दि. ०२/०९/२०२४

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने,
आपला विश्वासु,
श्री. महेश प्रभाकर राखाडे
मुख्य कार्यकारी अधिकारी
खान्देश विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिवंडी

विशेष सुचना :
१. गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकुब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता नाही.
२. ज्या सभासदांना हिशोबासंबंधी काही शंका असल्यास त्यांनी सभेपुर्वी ३ दिवस अगोदर सचिवांकडे लेखी कळवावे, आयत्यावेळी विचारलेल्या शंकांचा खुलासा सभेत केला जाणार नाही.
३. सभासदांनी सभेत येते वेळी अहवालाची प्रत सोबत आणावी.
४. ज्या सभासदांचे राहण्याचे व कामाचे पत्ते बदलले असतील अशा सभासदांनी नवीन पत्ता संस्थेस कळवावे.
५. ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी ताबडतोब वारसाची नेमणुक करावी.
६. सभासद ओळखपत्रासाठी सभासदांनी आपले दोन फोटो संस्थेच्या कार्यालयात आणून द्यावेत.

३३ वा वार्षिक अहवाल सन २०२३–२०२४

## भारतीय रेल्वे




### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

### भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

### युनियन बँक ऑफ इंडिया

■ पद क्र. अप्रेंटिस
■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 800/- SC/ST: 600/-, PWD:400/-
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/

### इंडियन ओव्हरसीज बँक

■ पद क्र.
अप्रेंटिस
■ पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 944/- SC/ST: 708/-, PWD:472/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.iob.in/

### उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## अतिक्रमण विभागामार्फत ऐरोली विभागात तोडक कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सागरनाथ रामा मढवी, घर नं - ३० ,मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव ,सेक्टर - ९ , ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते.

## भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

■ पद क्र.
असिस्टंट डायरेक्टर
असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर
परवाना इंजिन ड्रायव्हर
ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर
ड्रेज कंट्रोल ऑपरेटर
स्टोअर कीपर
मास्टर 2nd क्लास
स्टाफ कार ड्रायव्हर
मास्टर क्लास
मल्टी टास्किंग स्टाफ
टेक्निकल असिस्टंट (Civil/ Mechanical/ Marine Engineering/Naval Architect)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICWA/ Inter CA.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/ PWD:200/-
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://iwai.nic.in/

### केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल

■ पद क्र.
कॉन्स्टेबल/फायर (पुरुष)
■ शैक्षणिक पात्रता: १२वी(विज्ञान) उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता: उंची: १७० सेमी, छाती: ८०-८५ सेमी
■ वयाची अट: ३० सप्टेंबर २०२४ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM :फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४ (११:०० PM²)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.cisf.gov.in

## शामराव पेजे इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. ठाणे
# शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

शामराव पेजे इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. ठाणे यांची शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना पुढीलप्रमाणे आहे.
योजनेचा उद्देश व स्वरूप - इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत मंजूर केलेल्या रू.२०.०० लक्ष पर्यंत कर्ज रकमेवरील व्याज परतावा (कमाल १२ टक्केपर्यंत) महामंडळाकडून वितरीत केला जाईल.
१. राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी - महत्तम कर्ज मर्यादा रू.१०.०० लक्ष पर्यंत.
२. परदेशातंर्गत (Foreign) अभ्यासक्रमासाठी - महत्तम कर्ज मर्यादा रू.२०.०० लक्ष पर्यंत.

### लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती

१.अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे.
२.अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
३.अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी भागाकरीता रू.८.००लक्ष पर्यंत असावी.
४.अर्जदार हा इयत्ता १२ वी ६०% गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या व्दितीय वर्षे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६०% गुणांसह पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.
५.अर्जदाराचा सिबिल क्रेडिट स्कोअर ०, -१ (म्हणजेच यापूर्वी त्याने कर्ज घेतलेले नसावे) किंवा किमान ५०० पेक्षा जास्त असावा.

### कर्ज प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे

१.अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील (OBC) जातीचा दाखला.
२. रू.८.०० लक्ष पर्यंतचा उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार कार्यालयाकडून निर्गमित केलेला)
३. महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला (तहसिलदार कार्यालयाकडून निर्गमित केलेला)
४.अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड
५. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो
६. शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परिक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका.
७.अर्जदाराचा जन्माचा / वयाचा पुरावा
८.शैक्षणिक शुल्क संबधित संस्थेचे पत्र.
९.आधार संलग्न बँक खाते पुरावा.
१०.मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा.
११.शिष्यवृत्ती (Scholarship), शैक्षणिक शुल्कमाफी (Free ship), पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र.
१२. तसेच इतर आवश्यक कागदपत्रे.

कार्यपद्धती
ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर नोंद करणे आवश्यक आहे.
शैक्षणिक कर्ज योजनेतंर्गत येणारे अभ्यासक्रम

### अ.राज्यांतर्गत येणारे अभ्यासक्रम

१.आरोग्य विज्ञान - MBBS, BDS, BAMS, BHMS, इ. Pharm, व संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम.
२.अभियांत्रिकी - B.E, B.Tech., इ. -rch (सर्व शाखा), तसेच संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम इ.
३.व्यावसायिक अभ्यासक्रम - LLB, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटेरिंग, फॅशन टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन पदवी, बॅचलर ऑफ डिझाईन, फिल्म व टेलीव्हिजन अभ्यासक्रम, सनदी लेखापाल / कंपनी सचिव, पायलट, SHIPPING, MBA, MCA, विषयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, इ.
४.कृषी अन्नप्रकिया व पशुविज्ञान - Animal Fishery Sciences, B.Tech., BVSC (Bachelor of Veterinary Science), B. Sc. (कृषी व दुग्ध् विज्ञान) व संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.
ब.देशांतर्गत अभ्यासक्रम - केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त (NACC मानांकन प्राप्त) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य प्रात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता पुढे नमूद केलेल्या आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, कृषी अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान या अंतर्गत येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

### क. परदेशांतर्गत अभ्यासक्रम

(Foreign Education)
१.आरोग्य विज्ञान- Doctor OF Medicine (MD), Master of Science (MS)
२.अभियांत्रिकी - Civil, Mechanical, Electrical, Computer, Biotechnology, Generic Engineering, Architecture, etc.
३.व्यावसायिक व व्यवस्थापन - MBA, Hotel Management, LLB, LLM.
४. विज्ञान - Agriculture, Horticulture, Generic Science, Maths, Physics, Chemistry, Botany, Zoology, etc.
५.कला (Art) - Fine Art, Film Making, Animation, Design, Fashion.

### इतर अटी व शर्ती

परदेशी अभ्यासक्रमांतर्गत शैक्षणिक कर्ज व्याज परतावा लाभ घेण्याकरीता खालील आवश्यक कागदपत्रे अनिवार्य आहेत-
१.परदेशी शैक्षणिक संस्थेत परदेशी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थीकरिता QS (Quacquarelli Symonds) च्या रँकिंग / गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील असावे.
२. परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्रता परीक्षा (Graduate Record Exam- GRE), Test OF English as a Foreign Language (TOEFL) उत्तीर्ण विद्यार्थी.
व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी - जोपर्यंत शिक्षण चालू आहे तोपर्यंत व्याज परतावा मिळेल.अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमीत परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्याज रकमेचा परतावा (कमाल १२ टक्के पर्यंत) महामंडळ अदा करेल. व्याज परतावासाठी जास्तीत जास्त ५ वर्षे कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.
महामंडळाचा पत्ता व संपर्क :- शामराव पेजे इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. ठाणे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कळवा, ठाणे २ रा मजला , दत्तवाडी स्वामी समर्थ मठासमोर, सह्याद्री शाळेच्या बाजूला खारेगाव, कळवा, ठाणे - ४००६०५. दूरध्वनी क्र.-०२२-२०८१३६२५, भ्रमणध्वनी क्र.९८६९२८१७८७, ९२२६०९०९०९, ८७९३५७६५०३ ई-मेल :- dmobcthanegmail.com / www.msobcfdc.org
ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर नोंद करणे आवश्यक आहे.
अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या वरील पत्यावर अथवा महामंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन ठाणे जिल्हा व्यवस्थपक (अ.का.) निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
ठाणे

# प्रशासकीय भवनाच्या विकासाचा मार्ग मोकळा

## ‘त्या’ तीन गाळे मालकांचा दावा दिवाणी न्यायालयाने फेटाळला

पनवेल : पनवेल प्रशासकीय भवनाच्या जागेतील बचतधाममधील तीन गाळेधारकांनी १० वर्षांपूर्वी पनवेलच्या तहसीलदारांविरोधात दिवाणी न्यायालयात धाव घेऊन शासकीय जागेतील भाडेकरू असल्याचा दावा करून ही जागा ताब्यात राहण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा केला होता. हा दावा मागील आठवड्यात पनवेल जिल्हा दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्या सुनावणीत नामंजूर करण्याचे आदेश दिल्यामुळे पनवेलच्या प्रशासकीय भवनाच्या इमारतीचा संपूर्ण विकास करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी दिली.
जुन्या पनवेल तहसील कचेरीच्या कार्यालयालगत सुसज्ज इमारत बांधकामासाठी सर्व सरकारी कार्यालयांना स्थलांतरित केल्यानंतर तहसीलदारांनी जुन्या कचेरीलगतच्या सिटी सर्व्हे मालमत्ता क्रमांक ७०२ वरील ६३३.८ चौरस मीटरच्या क्षेत्रावर मुलकी बचतधाम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तळमजला आणि त्यावर एक मजला या इमारतीमधील गाळेधारकांना जागा स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर गाळेधारकांनी १९९९ सालच्या महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियमानुसार संबंधित जागेचा ताबा स्वत:कडे राहण्यासाठी न्यायालयात धाव घेत अलिबाग येथील कल्याणनिधीचे कुलाबा (रायगड) जिल्हा मुलकी सेवकवर्गाचे अध्यक्ष पनवेल तहसीलदारांविरोधात दावा केला होता. याच दाव्याचे प्रकरण न्यायाधीश कृ. मु. सोनावणे यांच्यासमोर सुरू होते.
पनवेलचे तहसीलदार यांच्या वतीने सरकारी वकील श्रीमती एम. आर. थळकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. बचतधामला तीन गाळे या मालमत्तेत देण्यात आले होते. मात्र शासकीय जागेतील गाळेधारकांना महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम लागू होत नसल्याने हा दावा नामंजूर करण्यात आल्याचे आदेश न्यायाधीश सोनावणे यांनी दिले. संबंधित प्रकरणात न्यायालयातील सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निकाल मिळण्यासाठी १० वर्षे ११ महिन्यांचा कालावधी लागला.
भवनाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगितले जात असून रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आणि सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या एकत्रित तारखा मिळत नसल्याने या भवनाचा लोकार्पण सोहळा पुढे ढकलला जात असल्याची चर्चा आहे. सध्या या इमारतीमधील पूर्वाश्रमीची सरकारी कार्यालये इतर भाड्याच्या जागेत सुरू आहेत.

### दहा वर्षांपासून रखडपट्टी

विविध सरकारी कार्यालये एका भवनाच्या इमारतीत झाल्यास नागरिकांचे हेलपाटे वाचतील या उद्देशाने सरकारने १० वर्षांपूर्वी पनवेलचे प्रशासकीय भवन बांधण्याचे काम हाती घेतले. मात्र वेगवेगळ्या अडचणींचा सामना करीत लाखो रुपये बांधकामावर खर्च करूनही या भवनाचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत आहे.

# ठाणेकरांना ७२ तासआधी हवा गुणवत्ता कळणार?

ठाणे : ठाणे शहरातील हवा सर्वकाळात उत्तम रहावी, यासाठी पालिका प्रशासनाने सीईईडब्ल्यू आणि यूएसएड या संस्थेच्या मदतीने ‘हवा गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा’ कार्यान्वित केली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून राज्यातील हवामान विभागाच्या धर्तीवर ७२ तासआधी ठाण्यातील हवा गुणवत्तेचा अंदाज वर्तविणे शक्य होणार आहे. यामुळे हवा प्रदुषण रोखण्यासाठी पालिकेला उपाययोजना करणे शक्य होणार आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.मुंबई, ठाण्यासह आसपासच्या शहरांमध्ये गेल्यावर्षी हवा प्रदुषणात वाढ झाल्याचे समोर आले होते. हवा प्रदुषण कमी करण्यासाठी उच्च न्यायलयाने उपाययोजना करण्याचे आदेश राज्य शासन आणि महापालिकांना दिले होते. त्यानुसार ठाणे महापालिकेने हवा प्रदुषण रोखण्यासाठी नियमावली तयार करून त्याची अंमलबजवणी सुरू केली होती. यामध्ये कचरा जाळणे, राडारोड्याची वाहतूक करणे तसेच हवा प्रदुषणास कारणीभूत ठरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत होती. त्यापाठोपाठ आता ठाणे शहरातील हवा सर्वकाळात उत्तम रहावी, यासाठी पालिका प्रशासनाने ‘हवा गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा’ कार्यान्वित केली आहे. कौन्सिल ऑन एनर्जी एन्व्हायरमेंट अँड वॉटर (सी ई ई डब्ल्यू) आणि युएसएड यांनी संयुक्तपणे ही ऑनलाइन यंत्रणा विकसित केली आहे. या यंत्रणेचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.
हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी, वेगवेगळ्या शहरात अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या परिस्थितीनुसार उपाययोजना करण्याची गरज असते. नेमकी ही बाब लक्षात घेऊन ‘हवा गुणवत्ता व्यवस्थापन यंत्रणा’ कार्यान्वित करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार शहरातील हवेची गुणवत्तेची मोजणी केली जाणार आहे. तसेच हवा प्रदुषणास कारणीभूत ठरणारे स्थानिक घटक, हवामान बदल आणि परिसरातील कचरा व्यवस्थापन, या सर्वांचा सविस्तर अभ्यास करून ७२ तासआधी शहरातील हवा गुवणत्तेचा अंदाज वर्तविला जाणार आहे. शहरात कचरा जाळून प्रदुषण करण्यात येते. काही ठिकाणी धुळ प्रदुषण करण्यात येते. याबाबतची माहिती शहरात बसविण्यात आलेल्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यांद्वारे घेतली जाणार असून त्यानंतर पथके तिथे जाऊन तेथील हवेची गुणवत्ता तपासून त्यावर उपाययोजना सुचविणार आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्याशी संपर्क साधला असता, नव्या यंत्रणेमुळे राज्यातील हवामान विभागाच्या धर्तीवर ७२ तासआधी ठाण्यातील हवा गुणवत्तेची माहिती मिळणार आहे. त्यामुळे त्याठिकाणी हवा प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे शक्य होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

उष्णता कृती आराखडा आणि नागरी पूर व्यवस्थापन नियोजन या दोन कृती आराखड्यांनंतर ठाणे शहरासाठी हवेची गुणवत्ता तपासून त्यात आवश्यक ते बदल सुचवणाऱ्या नवीन यंत्रणेची मोलाची भर पडली आहे. या यंत्रणेमुळे मिळणाऱ्या माहितीचा उपयोग करून तत्काळ करायचे बदल आणि दीर्घकाळात करायला लागणारे बदल याचे नियोजन करणे महापालिकेस शक्य होईल. या सूचनांमुळे हिवाळ्यात हवेची आणखी चांगली स्थिती आपल्याला राखता येईल. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मिळणाऱ्या माहितीचा उपयोग नागरिकांनाही व्हावा, यासाठी लवकरच त्याची एक लिंक ठाणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर देण्यात येणार आहे.

-सौरभ राव
(आयुक्त, ठाणे महापालिका)

## गणपती बाप्पा मोरय्या, मंगलमूर्ती मोरय्या

# मुख्यमंत्र्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी केले महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांचे कौतुक

■ ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाला दिली भेट ■ प्रियांका सौरभ राव यांचीही उपस्थिती




ठाणे : स्वतःचे कार्यालयाचे काम, घरची जबाबदारी सांभाळत ठाणे महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी आपली संस्कृती जपत, नव्या जुन्या पारंपरिक खेळाचा मेळ साधत नाविन्यपूर्ण मंगळागौर सादर केल्याबद्दल सर्व महिलांचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे यांनी भरभरून कौतुक केले.

ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सोमवारी महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महापालिका कर्मचारी, मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी व ठाण्यातील सृजनसखी महिला यांनी मंगळागौर सादर केली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या पत्नी प्रियांका राव, माजी नगरसेविका नम्रता भोसले, उपायुक्त मीनल पालांडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितील, कार्यालयीन अधीक्षक रिमा देवरूखकर आदी उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सवाचे यंदाचे ४२ वे वर्षे आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गेली दोन वर्षे ठाणे महापालिकेच्या अधिकारी कर्मचारी पारंपरिक अशी मंगळागौर सादर करतात. यंदाही ठाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी नव्या जुन्या पारंपरिक खेळाचा मेळ साधत नाविन्यपूर्ण अशी मंगळागौर सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी सर्व महिलांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या पत्नी प्रियांका राव यांच्यासह खेळात सहभागी होत मंगळागौरीचा आनंद लुटला.

# ठाणे घोडबंदर रोडवर मेट्रोपिलरला एसटी धडकली

### ८ प्रवाशांना झाली दुखापत

### घोडबंदर रोड झालाय शापित



ठाणे : १३ प्रवासी घेऊन निघालेली एसटी महामंडळाची आंबेजोगाई ते बोरीवली एसटी बसला ओवळा येथे अपघात घडला. एसटी चालक के. अडसूळ यांचे नियंत्रण सुटल्याने एसटी बस ही ओवळा परिसरातील घोडबंदरकडे जाणाऱ्या वाहिनीवर मेट्रोच्या पिलरला धडकली. मंगळवारी सकाळी ११-२७ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातात १३ पैकी ६ प्रवासी जखमी झाल्याची माहिती ठाणे पालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

ठाण्याचा विविध राज्यमार्गाला जोडला जाणारा महामार्ग हा शापित झाल्याचे विविध घटनेवरून दिसून येत आहे. मागील आठवड्यात झालेल्या दोन ते तीन अपघातात ठाण्यात वाहतूक कोंडीचे उग्र स्वरूप पाहायला मिळाले. ठिकाण मात्र घोडबंदरकडे जाणारी वाहिनी त्यामुळे या अपघातात जीवितहानी नसली तरीही वाहतूक कोंडीचा मोठा त्रास जाणवला.

शनिवारी आणि रविवारी केमिकल कंटेनर आणि केमिकल पावडर वाहवून नेणाऱ्या ट्रक उलटले. त्यानंतर २४ तासाच्या कालावधीत पुन्हा एसटी महामंडळाची एसटी हि पातलीपाडा ब्रिज पूर्वीच असलेल्या दुभाजकावर चढली. बस रिकामी असल्याने कुठलीही जीवितहानी झाली नाही. त्या तीन घटनांना ४८ तास उलटत नाही तोच पुन्हा घोडबंदरच्या ओवळा परिसरातील मेट्रोच्या पिलरला एसटी बस धडकल्याने झालेल्या अपघातात १३ पैकी आठ प्रवासी हे जखमी झाल्याची घटना मंगळवारी सकाळी ११-२७ वाजण्याच्या सुमारास घडली. जखमींना टायटन हॉस्पिटल व ब्रह्मांड हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये बस चालक आणि वाहकासह इतर सहा प्रवाशांचा समावेश आहे. श्री. के. अडसूळ (बस चालक) (३५) डाव्या हाताला गंभीर दुखापत, चाटे(बस वाहक) यांच्या उजव्या हाताला किरकोळ दुखापत, उद्धव चौरे(६५) यांच्या ओठांना व दाताला दुखापत झाली. उर्मिला चौरे(५५) यांना मुक्कामार लागला. सलीम शेख(५८) र्ओठांना मार लागला. आत्माराम शेजुळ(४९) ओठांना दाताला किरकोळ दुखापत झाली राजश्री शेजुळ (४२) किरकोळ मुक्कामार लागला तर आकांक्षा शेजुळ(स्त्री/३५ वर्ष, गुडघ्याला मार लागला आहे. तर जखमी प्रवाशांना उपचारासाठी टायटन हॉस्पिटल व ब्रह्मांड हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात यायची माहिती खोपट एसटी डेपो कार्यालतून देण्यात आलेली आहे.

### नवी मुंबई महानगरपालिकेस मिळाले

# स्वत:चे पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेचे 'पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अर्थात National Medical Commission मार्फत परवानगी प्राप्त झालेली आहे. यामुळे नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेस शक्य होणार असून महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचे सक्षमीकरण होणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले आहे.

महानगरपालिकेचे पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. राज्य शासनामार्फत आवश्यक परवानगी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले व त्यांनी संबंधित विभागांस जलद कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्रीअजित पवार यांचेही आवश्यक परवानगी प्राप्त व्हावी यादृष्टीने सहकार्य लाभले.

त्यानुसार राज्य शासनामार्फत आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर ठाणे लोकसभा सदस्य खा. नरेश म्हस्के यांनी यामध्ये विशेष पुढाकार घेत केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव व केंद्रीय आरोग्य विभाग यांच्याकडे परवानगी मिळण्याबाबत पत्रव्यवहार करुन व प्रत्यक्ष भेटून सातत्याने पाठपुरावा केला.

याचा सकारात्मक परिणाम होत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाची नवी मुंबई महानगरपालिका पदव्युत्तर पदवी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी प्राप्त झाली असून ही नवी मुंबईकरांना गणेशोत्सवात मिळालेली मौल्यवान आरोग्यपूर्ण भेट आहे.

सदर मंजूरीनुसार पीजी मेडीकल सायन्स इन्स्टिटयुटमध्ये पहिल्या टप्प्यात 'मेडिसीन (३ सीट्स)', 'ऑर्थोपेडीक (२ सीट्स)', 'गायनॅकोलॉजी (८ सीट्स)' व 'पिडीयाट्रीक (४ सीट्स)' अशा ४ शाखा सुरु करण्यात येत असून लवकरच 'सर्जरी' याही शाखेला परवानगी प्राप्त होणार आहे.

मेडीकल सायन्स इन्स्टिटयुट सुरु करण्यासाठी पालिकेच्या वाशी व नेरुळ सार्वजनिक रुग्णालयात सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे डीन, प्राध्यापक, सहा. प्राध्यापक व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात लवकरच महाविद्यालय सुरू केले जाणार आहे.

# 97 अनधिकृत नळजोडण्या तोडल्या

### पाणीपुरवठा विभागाची मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रात कारवाई

ठाणे (गणेश भोईटे) : मुंब्रा आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रात भोलेनाथ नगर, खरीवली, देवी नाला, ग्रीन पार्क या भागात एक इंच व्यासाच्या ९७ नळ जोडण्या पाणी पुरवठा विभागाने खंडित केल्या आहेत. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.




गेल्या आठवड्यात, पाणी बील वसुलीबाबत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी पाणी पुरवठा विभागाचे अभियंता आणि मीटर रिडर यांची बैठक घेतली. या बैठकीत, मीटर रीडरना साप्ताहिक उद्दीष्ट निश्चित करून देण्यात आले. तसेच, अवैध नळ संयोजने खंडित करण्यासाठी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. अनधिकृत इमारतींमध्ये पाण्याचा वापर सुरू असल्यास त्यावरही गुन्हे दाखल करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिले आहेत.

या निर्देशांच्या अनुषंगाने, मुंब्रा व दिवा प्रभागामध्ये कल्याण फाटा येथून ६६० मीमी व ३५० मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीमधून दररोज सुमारे ५७ दशलक्ष लीटर पाणी पुरवठा होतो. काही नागरिकांनी या मुख्य जलवाहिनीवर अवैधपणे नळ संयोजने घेतल्याचे निर्दशनास आले होते. त्यानुसार ही नळ संयोजने तोडण्याची कारवाई करण्यात आली. याचप्रकारे संपूर्ण महापालिका क्षेत्रात अवैध नळ संयोजने तोडण्यात येणार असल्याचे उपनगर अभियंता (पाणीपुरवठा) विनोद पवार यांनी सांगितले.

### ठेकेदाराकडून लाच स्वीकारणारा

# पालिकेचा कनिष्ठ अभियंता निलंबित

कल्याण : एका ठेकेदाराकडून कामाच्या बदल्यात लाच स्वीकारणारा कल्याण डोंबिवली पालिकेच्या दक्षता आणि गुणनियंत्रण विभागाचा कनिष्ठ अभियता तथा प्रयोगशाळा साहाय्यक संजय सोमवंशी यांना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सोमवारी तडकाफडकी निलंबित केले.

अभियंता सोमवंशी यांना निवृत्तीला चार महिने शिल्लक असताना, ते लाचखोरीच्या सापळ्यात अडकले. सोमवंशी यांच्या लाचखोरीमुळे कल्याण डोंबिवली पालिकेतील मागील २५ वर्षातील एकूण लाचखोर कर्मचाऱ्यांची संख्या आता ४४ झाली आहे. राज्यातील २७ महापालिकांमध्ये सर्वाधिक टक्केवारी आणि लाचखोरीचे प्रकार कल्याण डोंबिवली पालिकेत चालतात, याविषयी शासनाकडे गोपनीय विभागाचे अहवाल आहेत. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेत वर्णी लागण्यासाठी शासकीय सेवेतील अधिकारी राजकीय दबाव आणि मुख्याधिकाऱ्यांच्या मंत्रालयात वजन असलेल्या एका गटसमुहाच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात येते.

एका ठेकेदाराकडून कामाच्या बदल्यात पालिका मुख्यालयातील आपल्या दालनात कनिष्ठ अभियंता संजय सोमवंशी पैशाची लाच स्वीकारत आहेत, अशी दृश्यध्वनी चित्रफित सोमवारी दुपारी समाज माध्यमांवर प्रसारीत झाली. या दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये अभियंता सोमवंशी हे लाच देणाऱ्या ठेकेदाराला, तो घ्यायला येतो एक आणि देतो एक. नमस्कार करतो आणि निघून जातो, असे बोलत असल्याचे दिसते. गटार आणि काँक्रिट रस्त्याच्या गुणवत्ता तपासणीच्या कामासाठी सोमवंशी यांनी ही लाच ठेकेदाराकडून स्वीकारली असल्याचे ठेकेदारांकडून सांगण्यात येते. तर, ध्वजनिधी संकलनासाठी ही रक्कम स्वीकारली असल्याचा बचावात्मक पवित्रा सोमवंशी यांनी घेतला असल्याचे प्रशासनातील चर्चेतून समजते. सोमवंशी यांना संपर्क साधला, तो होऊ शकला नाही.

पालिका मुख्यालयातील दक्षता व गुणनियंत्रण विभागाचा अभियंता लाच घेतानाची दृश्यध्वनी चित्रफित प्रसारित झाल्याची माहिती आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना समजली. त्यांनी या विषयीची माहिती घेऊन तात्काळ कनिष्ठ अभियंता संजय सोमवंशी यांना पालिका सेवेतून निलंबित केले. त्यांची विभागीय चौकशी लावण्याचे आदेश आयुक्तांनी तात्काळ दिले. या तडकाफडकी आणि आक्रमक कारवाईंमुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना धडकी भरली आहे. दोन महिन्यापूर्वी खंडणीचा गुन्हा दाखल होताच पालिका सेवेतील वाहन चालक कामगार विनोद लकेश्री यांना आयुक्तांनी तात्काळ निलंबित केले होते.

# महावाचन उत्सवात ५ हजाराहून अधिक विद्यार्थी, शिक्षक, पालकांनी अधोरेखित केले पुस्तकांचे महत्व

नवी मुंबई : वाचन हे व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्वाचे साधन असून कोणत्याही व्यक्तीच्या विकासासाठी आणि समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीसाठी वाचनसंस्कृती रुजविणे आवश्यक आहे हे लक्षात घेत राज्यातील सर्व शाळांमध्ये महावाचन चळवळ राबविण्याचा निर्णय १६ जुलै २०२४ या शासन निर्णयानुसार घेण्यात आलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव २०२४' हा उपक्रम उत्साहाने राबविला जात आहे. याकरिता इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी असे तीन गट करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार व इच्छेनुसार अभ्यासाव्यतिरिक्त मराठी साहित्य विश्वातील नावाजलेल्या साहित्यिकांचे विविध साहित्य, कथा, कादंबऱ्या यांची निवड करून वाचन करीत आहेत व त्यावर विचार करून पुस्तकाचा सारांश लिहीत आहेत. हा सारांश महावाचन पोर्टलवर अपलोड केला जात आहे.

या वाचन चळवळीचा एक भाग म्हणून 'महावाचन उत्सव २०२४' अंतर्गत श्रीगणेशोत्सवाची सुट्टी लागण्यापूर्वी कोपरखैरणे गाव येथील नमुंमपा शाळा क्रमांक ३६ येथे वाचनीय पुस्तकांचे ग्रंथालय प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या ग्रंथालय प्रदर्शनामध्ये कोपरखैरणे परिसरातील २२ शाळा सहभागी झाल्या होत्या. या प्रदर्शनाप्रसंगी ९७ मुख्याध्यापक, ७१ पालक, १३६ शिक्षक, ५१४३ विद्यार्थी अशा एकूण ५४४७ उपस्थितांनी या प्रदर्शनाला भेट देत ग्रंथसंपदेचा अनुभव घेतला.

या ग्रंथालय प्रदर्शनाचे शुभारंभ शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी महानगरपालिका सचिव तथा कवयित्री श्रीम. चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी श्रीम. अरुणा यादव, कवी मोहन काळे उपस्थित होते. यावेळी श्रीम. चित्रा बाविस्कर व मोहन काळे यांनी विद्यार्थ्यांना सुंदर कविता ऐकवत वाचनाचे महत्त्व विशद केले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी कविता गायन केले. वाचन संस्कृती जपणुकीच्यसा दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या या अभिनव उपक्रमात शिक्षक, विद्यार्थी, पालक यांचा उत्स्फुर्तपणे सहभाग लाभला.





मा. नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे यांच्या बाप्पाला निरोप देताना कुटुंबिय



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी विराजित श्री गणेशाचे दर्शन लोकनेते आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, युवानेते संकल्प नाईक, यांनी मनोभावे घेतले. यावेळी समाजसेविका सौ. अमृता फडणवीस देखील उपस्थित होत्या.




रोहिदास मुंडे यांच्या घरातील गणराया.



मा. आमदार रमेशदादा पाटील व मा. नगरसेवक तानाजी पाटील यांच्या घरातील श्रींची मूर्ती



मा. नगरसेविका नर्मता रवि घरत यांच्या घरातील गणरायाचे दर्शन घेताना आ. सरनाईक




महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी चौरंगाच करावा पांचपाखाडीत साकारला देखावा

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771